Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I01S01V13P0016

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Jan'25
Issue–I(I), Volume–XIII

# आदिवासी कविता : भावना आणि विद्रोह

डॉ. प्रीती किशोर उमाठे
एम.ए. (मराठी) पीएच.डी
मराठी विभाग प्रमुख
डॉ. एम. के. उमाठे महाविद्यालय, भामटी रिंग रोड, नागपूर-२२

## सारांश

आदिवासी समाजाची पार्श्वभूमी बघत असताना प्राचीन काळापासून निर्माण झालेली समाज संस्कृती आपल्या दृष्टीस येत असताना देखील पाहिजे त्या प्रमाणात इतर जनसमुदायांनी प्रगतीचा हातभार लावलेला दिसून येत नाही. त्यामुळेच साहित्य रूपाने समोर आलेल्या कवी कादंबरीकार नाटककार यांनी आपल्या लिखित साहित्याच्या माध्यमातून होणारी पिळवणूक ही समोर आणलेली दिसते. आदिवासी साहित्य हे जनवादी साहित्य आहे असे सिध्द होते.आदिवासी साहित्य व त्यांचे जीवन व्यापक स्वरूपाचे आहे. हेच जीवन कवींनी कवितेच्या माध्यमातून मांडलेले आहे. यायचं अर्थ असा की आजचे आदिवासी साहित्य हे नव्या प्रबोधनाचे आशेचे किरण आहे.

## बीज शब्द

अनाकलनीय,दीपस्तंभ, वनवासी, बुद्धिजीवी, विद्रोह

### प्रस्तावना

मराठी साहित्यामध्ये वेगवेगळे साहित्य प्रवाह बघायला मिळतात. साहित्याच्या इतिहासाचा विचार करता संत साहित्य व वारकरी संप्रदायाच्या साहित्याला इतिहासाच्या भागांमध्ये उधाण आले असले तरी नंतर नंतर भारतामध्ये इतर भाषेबरोबरच महाराष्ट्रात देखील साहित्याचे वेगवेगळे प्रवाह उदयास येऊ लागले. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये एका विशिष्ट मोठ्या जनसमुदायापासून काही समाजातील घटक हा वेगळा झाला त्यामुळे नव्या घटकातील नव्या विचाराच्या समाजाच्या कृतीला व विचारांना नवी चालना मिळत केली. यामधूनच नवविचार व नव साहित्य निर्माण होऊ लागले. त्यामध्ये दलित साहित्य बरोबरच नवबौद्धांचे साहित्य, स्त्रीवादी साहित्य, महानगरीय साहित्य, ग्रामीण साहित्य, महानगरीय स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य असे वेगवेगळे नवे प्रवाह निर्माण होत राहिले. यामधून

https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I01S01V13P0016
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on
Scientific Research Jan'25
Issue–I(I), Volume–XIII

ग्रामीण जीवनाच्या, स्त्री जीवनाच्या, महानगरीय जीवनाच्या व्यथा आणि वेदना या समोर येऊ लागल्या; त्याचबरोबर जंगलात राहणाऱ्या आदिवासी जनतेच्या विकासामुळेच साहित्य विकास सुद्धा झालेला दिसतो. आदिवासींचा झालेला विकास त्यांच्या भावभावना त्यांचे जीवन जगण्याची विशिष्ट शैली या सर्वांमुळे आदिवासी मराठी साहित्य समाजासमोर येऊ लागले व साहित्यामधून आदिवासी लेखक किंवा इतर लेखक आदिवासींचे जीवन व भावना साहित्यामधून मांडू लागले त्यामुळेच आदिवासी साहित्य हे प्रगल्भपणे समोर येताना साठोत्तरी मराठी साहित्यात तसेच नवोदत्तरी मराठी साहित्यामध्ये दिसते. आदिवासी मराठी साहित्य हे साहित्याच्या वेगवेगळ्या प्रकारांमधून समोर येताना दिसते त्यात प्रामुख्याने कथा,कविता, कादंबरी, नाटक, लोकसाहित्य यामधून येत समोर येताना दिसते. म्हणजेच आदिवासी साहित्य हे साहित्य रुपी समोर येण्याअगोदरच ते लोकसंस्कृतीमध्ये मौखिक रूपाने आपले स्थान टिकवून होतेच. परंतु काही कारणाने ते दुर्लक्षित राहिल्यामुळे समाजासमोर येऊ शकले नाही. त्यामुळे आत्ता आत्ता मराठी साहित्यामध्ये आदिवासी साहित्य हे आपली स्थान निश्चिती करताना दिसून येत आहे. त्यात प्रामुख्याने सांगायचे झाले तर विनायक तुमराम म्हणतात की," आदिवासी साहित्य हे कोणत्याही साहित्याची प्रतिकृती नाही. कोणत्याही साहित्याच्या प्रेरणांचा अविष्कार नाही. ते स्वतंत्र स्वयंभू आणि स्वयंसिद्ध आहे. त्यामुळे या साहित्याच्या प्रेरणाही त्यांच्या अस्तित्व इतक्याच प्राचीन आहे." असे म्हणतात. विनायक तुमराम यांच्या म्हणण्याचा विचार करीत असताना असे वाटते की आदिवासी साहित्य हे पुस्तक रुपी किंवा लिखित साहित्याचे रूप घेऊन समोर येण्याच्या अगोदर अतिशय प्राचीन काळापासून मौखिक स्वरूपात ते लोक जीवनात रुजलेले होते आणि त्यामुळेच आदिवासी संस्कृती ही प्राचीन संस्कृती असल्यामुळे त्यांचे साहित्यही प्राचीन साहित्य आहे त्यावर नक्कीच कोणत्याही संस्कृतीचा किंवा विचारांचा प्रभाव पडणे शक्यच नाही. म्हणून डॉ. तुमराम यांचे मत अगदी खरे वाटते. मराठी साहित्याचा अभ्यास करीत असताना आदिवासी साहित्याच्या वेगळेपणाचा शोध घ्यावा वाटतो. आदिवासी साहित्यामधून कथा, कादंबरी, नाटक किंवा आत्मकथने व इतर ललित साहित्य येताना दिसते परंतु कवितेच्या माध्यमातून काही आदिवासी कवींनी आपला आदिवासी समाजाचा अंत स्वर हा अतिशय कसदारपणे उतरवलेला दिसतो त्यामुळेच आदिवासी कवी व त्यांच्या कविता यामधून येणाऱ्या आदिवासी काव्य प्रांतातील साहित्याची लेखणी समाजातील दबलेल्या, छळलेल्या भावनांची होणारी कुचंबना विद्रोहा मधूनच

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I01S01V13P0016

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Jan'25
Issue–I(I), Volume–XIII

समोर आणताना कवितेच्या माध्यमातून कशा पद्धतीने दिसून येते हे संबंधित लेखाच्या माध्यमातून अभ्यासणार आहोत.

## आदिवासी साहित्य आणि कविता

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मराठी वाङ्मयामध्ये वेगवेगळे साहित्य प्रवाह निर्माण झालेले आहेत. कारण याच काळात वेगवेगळ्या चळवळीला उधाण आल्यामुळे वांग्मयीन चळवळी सुद्धा प्रामुख्याने समोर येऊ लागल्या. समाजातील एका घटकाचा दुसऱ्या घटकाशी वाद विवाद यामुळे आपापल्या भावानुभूतीवरून साहित्य प्रवाहाला चालना मिळाली. या प्रवाहा मधूनच दलित साहित्य ग्रामीण साहित्य स्त्रीवादी साहित्य ख्रिस्ती साहित्य मुस्लिम साहित्य बालसाहित्य विज्ञान साहित्य कामगार साहित्य भटक्या विमुक्तांचे साहित्य जन साहित्य व याचबरोबर आदिवासी साहित्य सुद्धा समकालीनतेचा प्रवाह सोबत घेऊन चालत होती. म्हणूनच आदिवासी साहित्याचा विद्रोह हा कथा, कादंबरी, कवितेमधून दिसून येत होता. कवितेच्या माध्यमातून आदिवासी जनसमुदायाचा होणारा विद्रोह हा कवींनी अतिशय विस्तृतपणे हेरलेला दिसून येतो. कवितेमधील ताकत आणि काव्याची वांग्मयीन लवचिकता एखाद्या विषयाला समाजासमोर आणण्याकरिता किती महत्त्वाचे कार्य बजावत असते हे आदिवासी मराठी कवितेमधून कवींनी दाखवून दिले आहे. त्यामुळेच भुजंग मेश्राम, उत्तम धोंगडे, विनायक तुमराम, वहरो सोनवणे, वामन शेडमाके, प्रभू राजगडकर, उषाकिरण आत्राम, माधव सरकुंडे, कुसुम आलम, सुनील कुमरे, नीलकंठ कुळसंगे, पुरुषोत्तम शेडमाके, गोविंद गारे इत्यादी कवींनी आदिवासी साहित्याला कवितेमधून आदिवासी समाजाचे जीवन यातना या साहित्यरुपी समोर आणल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये आदिवासी मराठी कविता व त्यांच्या कवितेला विद्रोही कविता आणि विद्रोही कवी म्हणून ओळखल्या जाते. या काव्यसंग्रहांमध्ये "आदिवासी कविता" या नावाने प्रकाशित झालेला गोंडी भाषेतील कवितासंग्रह हा भुजंग मेश्राम यांचा असून त्यांनी गोंडी भाषेमधून आदिवासी कवितेची दालने उघडलेली दिसते. त्यानंतर भुजंग मेश्राम यांचे मोहोळ, उलगुलान असे काव्यसंग्रह अनुक्रमे प्रकाशित झाले त्यामध्ये आदिवासींच्या भावना आणि भविष्याच्या निर्माण होणाऱ्या समस्या यांचा विस्तृत आढावा या कवितासंग्रहांमधून घेतलेला दिसून येतो. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिलेली स्वातंत्रता, समता, बंधुता या मूल्यांचा स्वीकार सर्व जनतेनी करावा यामध्ये कोणत्याही व्यक्तीला जात-पात धर्म यावर भेदभाव करणाऱ्या विचारसरणीला विरोध करणाऱ्या या आदिवासी कविता अतिशय उत्कृष्ट पणे आपली बाजू मांडताना दिसतात. त्याचबरोबर मेश्राम यांच्या कविता

अंधश्रद्धेला अजिबात थारा न देता आदिवासींच्या वर्तमान जीवनाची व्यथा आणि वेदना मांडतात. आदिवासींची संस्कृती आणि त्यामधूनच निर्माण होणाऱ्या रूढी परंपरा यांचे ओझे वाहत असताना भौगोलिक वातावरणाचा त्यांच्या जीवनावर होणारा परिणाम दर्शवितात. तसेच मोहोळ या काव्यसंग्रह मधून आदिवासींच्या वस्त्यांवर शतकानू शतके झालेली लूट; सावकार, भांडवलदार यांनी केलेले शोषण आणि रानावनातील आपला उदरनिर्वाह चालविणारे मानव समूह यांची शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून होणारी पिळवणूक ही कवितेमधून मांडलेली आहे. या सर्वांचा प्रतिकार करणारी शक्ती निर्माण करण्यासाठी भुजंग मेश्राम यांनी आपल्या काव्यसंग्रह मधून पेटती केली आहे. कवी भुजंग मेश्राम आपल्या कवितेत म्हणतात की,

"कापूस आतूनच भेटत असतो भुरभुर
हे त्यांना माहीत असावे
म्हणून तर तुझ्या ओटीतला कापूस पाहून
ते गुपचाप निघून गेले"

आदिवासी महिलांवर होणारे अत्याचार अन्याय हे सुद्धा कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून नांगर जनतेला दाखवून दिलेले आहे. त्या धोक्याचे चित्र त्यांच्या डोळ्यासमोर दिसत आहे असे वाटते. म्हणूनच ते आपल्या कवितेच्या माध्यमातून सर्वांना वास्तवाशी भिडण्याचे सामर्थ्य देताना दिसतात. ते आपल्या कवितेमधून म्हणतात की,

"माझ्या मित्रांनो एवढं करा
गुड्या गुड्यांवर पोळा पोळावर तुमचे मुक्त हात दिसू द्या
अन लोकशाहीच्या समुद्रात दीपस्तंभ शोधताना
कैक सुसंस्कृत द्रोणाचार्य भेटतील
मात्र तुमचा अंगठा शाबूत असू द्या"

कवी भुजंग मेश्राम यांनी आपल्या कवितेमधून प्रस्थापित शासनाला अजिबात न घाबरता आपल्या समाजाला समोर जाण्याचे आवाहन केलेले दिसून येते. म्हणूनच आदिवासी मराठी कविता या आपल्या भावनांचा विस्तार विद्रोहातून करत आहेत असे वाटते.

कवी भुजंग मेश्राम यांचे बरोबरच डॉ. उत्तमराव धोंगडे हे पश्चिम महाराष्ट्रातील कवी यांचे कविता संग्रह सुद्धा आदिवासी साहित्यामध्ये अतिशय महत्त्वाचे आहेत. त्यांच्या "वनवासी" या काव्यसंग्रहामधून आदिवासी जीवनात वर्षानुवर्षे चालत असणारी

वेठबिगारी, आर्थिक अडचणी, सांस्कृतिक व सामाजिक शोषण, रूढी परंपरेतून चालत आलेल्या काही प्रथा आणि त्यामधूनच आदिवासी समाजाला जडणारे दारूचे व्यसन या विषयावर हृदयाला स्पर्श करणाऱ्या कविता धोंगडे यांनी प्रसिद्ध केले आहे. कवितेच्या माध्यमातून त्यांनी नशिबाला दोष न देता, जन्माला दोष न देता, वाल्याचा जसा वाल्मिकी झाला! अगदी त्याच पद्धतीने तुम्हीही उभे राहू शकता हे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. जंगलात राहून शिकार करीत असताना व त्यावरच आपला उदरनिर्वाह करून जशीच्या तशी प्रवृत्ती राखण्यापेक्षा स्व विकासावर कशा पद्धतीने भर द्यावा हा विचार डॉ. धोंगडे यांनी आपल्या काव्याद्वारे मांडलेला आहे. भोळ्या भाबड्या आदिवासींना अन्याय अत्याचाराला समोर जावे लागत आहे. आई बहिणींवर होणारे बलात्कार व त्यामुळेच घरे दारे उध्वस्त होत आहेत. याचे भीषण वास्तव आपल्या कवितेमधून सांगितले आहे.

"गोधड" या कवितासंग्रहाच्या माध्यमातून वाहरू सोनवणे यांनी सुद्धा दिनदुबळ्या आदिवासी मजूर, कामगार व दबलेल्या वर्गाला चेतना देण्यासाठी आपल्या साहित्याचा वापर केलेला दिसतो. वाहरू सोनवणे यांच्या कवितेमधून आदिवासींनी तळागाळापासून विकास करून बुद्धिजीवी व्हावे असा आग्रह देखील करताना दिसतात. आदिवासी स्त्रियांची व्यथा व वेदना सुद्धा या कवितासंग्रहामधून समाजासमोर आलेली दिसते. वहरू सोनवणे त्यांच्या कवितेच्या माध्यमातून स्त्रियांच्या पोटाच्या भुकेची जाणीव करून देताना दिसतात. ते कवितेच्या माध्यमातून सांगतात की,

"एक वस्ती
तिथं पाल मांडतात
पोटासाठी पोट आलं, तरीही त्यांना
पाल मांडावाच लागतो,
पालमाडी वस्ती ती"

या त्यांच्या "पालमाडी वस्ती" या कवितेच्या माध्यमातून स्त्रियांना वासनेची भूक नसून पोटाची भूक आहे हे दर्शवताना दिसतात.

डॉ. विनायक तुमराम सुद्धा आपल्या कवितेच्या माध्यमातून आदिवासींना पेटून उठून आपला हक्क हिसकावून घेण्याचा व विद्रोह करण्याचा विचार मांडतात. डॉ. तुमराम आपल्या

कवितेमधून आदिवासी व निसर्गाचे नाते सुद्धा मांडताना दिसतात. ते आपल्या कवितेच्या माध्यमातून सांगतात की,

"रान वृक्षाच्या पानोपानी
मी माझ्या वनवासावर
महाकाव्य लिहून ठेवला आहे
येत्या प्रबुद्ध युगाच्या रक्ताळ डोळ्यांना
वाचता येण्यासाठी"

आदिवासी जनतेच्या दुःखाचे वर्णन तुमराम यांच्या कवितेमधून सुवभावनेने आलेले दिसून येते. होणारी पिळवणूक आणि युगांना युगे चालत आलेली परंपरा ही आता तरी बदलावी यासाठी कवी आटोकाट प्रयत्न करताना दिसतो आहे.

आदिवासी कवितेच्या माध्यमातून प्रसिद्धीस येणारी कवयत्री उषाकिरण आत्राम यांचे सुद्धा साहित्य क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान आहे. त्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून निर्भीड नेतृत्व करणारी जिद्दी व हुशार स्त्री आकारलेली दिसते. उषाकिरण आत्राम यांच्या कवितेमधून सर्व स्त्रियांना जणू जीवन जगण्याचा आधार मिळावा असेच वाटते. त्यांच्या कवितेमधून त्या स्त्रियांना उद्देश पूर्ण सांगताना लिहितात की,

"बाय ! तू रडू नगस ग
रडणं सुखी बायांचे काम आहे.
आपल्याले रडाची जन्मापासूनच सवनाय
तू जन्मली तवा दगडानं नाळ कापली"

अशा पद्धतीने आदिवासी स्त्री आपल्या परिस्थितीला समर्पित व्हावी आणि आपल्या जीवन जगण्याचा प्रवास फुलबागेप्रमाणे दुःखी न होता फुलवत राहावी असे कवयित्रीला वाटत असावे म्हणूनच कवियत्रीने आदिवासी स्त्रियांना शारीरिक क्षमता वाढवून येणाऱ्या परिस्थिती समोर उभे राहावे तिच्याशी दोन हात करावे असे आवाहन केलेले दिसते.

अशाच पद्धतीने आदिवासी समाजाची होणारी पिळवणूक, लुबाडणूक, सावकारी अत्याचार, शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून होणारी बंडखोरी, प्रस्थापित शासन व्यवस्था आणि स्त्री या सर्व विषयांवर विस्तृत लिखाण कवितेच्या माध्यमातून या आदिवासी कवींनी केलेले दिसते. याबरोबरच वामन शेडमके, कुसुम अलाम, बाबाराव मडावी अशा अनेक कवींनी केलेले दिसते. त्यांनी

आपल्या कवितेच्या माध्यमातून आदिवासी जनसमुदायाला प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात अन्यायाच्या विरोधात उठून उभे राहण्याचे एकंदरीत आवाहन केल्याचेच दिसून येते. म्हणून अभ्यासत असताना शेवटी कवी राठवा यांची एक कविता नक्कीच सांगावी वाटते ते आपल्या "शब्द" या कवितेमधून लिहितात की,

"आदिवासी हा शब्द किती मधाळ वाटतो
थोडासा दाबला की त्यातून मध टपकतो
म्हणून जो तो त्याला मन मानेल तसा पीरगाळतो
...... पण लक्षात ठेवा
हा शब्द अजूनही अनाकलनीय आहे....!

असे कवी जेव्हा सांगतात तेव्हा आदिवासींचे जीवन व त्यांच्या जीवनाची दिशा अजूनही समाजाच्या दृष्टिकोनातून अनाकलनीय आहे असे नक्कीच वाटते.

संदर्भ ग्रंथ

१) सोनवणे वाहरू, 'आदिवासी कविता', महासंघ प्रकाशन, पुणे
२) ठाकरे राजेंद्र, ' आदिवासी कविता : एक आकलन', सुगावा प्रकाशन, पुणे
३) आत्राम उषाकिरण,'आक्रोश आदिवासी भारत', आदिवासी साहित्य संमेलन', विशेष अंक, यवतमाळ
४) घोंगडे तुकाराम,'आदिवासी साहित्यातील जीवन जाणिवा', अंतर्भूत लेख, गोंदन २०१९, ९२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, यवतमाळ
५) तुमराम विनायक,' वर्तनात सुयोग्य परिवर्तन म्हणजे शिक्षण', दैनिक वनवैभव,(३१ जुलै २००२), चंद्रपूर